# अनामप्रेम स्नेहवार्ता




## अनामप्रेम मासिक वृत्तपत्रिका
## ऑगस्ट - 2026

**अनामप्रेम हेल्पलाईन क्रमांक - 9011946868**

# अनामप्रेमच्या कार्याचा सन्मान..!







**दिव्यांगांच्या शिक्षण, पुनर्वसन, कौशल्यविकास व स्वावलंबनासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेला ‘द पब्लिक ब्रॉडकास्ट मीडिया कंपनी’ आयोजित ‘द पब्लिक एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६’ मध्ये दिव्यांग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.**

**या पुरस्काराच्या रूपाने अनामप्रेमच्या कार्याचे पुन्हा एकदा सन्मानपूर्वक दखल घेण्यात आली आहे. हा गौरव संपूर्ण टीम अनामप्रेमसाठी प्रेरणादायी आणि अभिमानाचा क्षण आहे.**



पुढारी

## मराठमोळ्या कल्पना कदमची भारताच्या आठ खेळाडूंमध्ये निवड

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्राच्या कल्पना कदम हिची अस्ताना अस्तानामध्ये (कझाकस्तान) होणाऱ्या जागतिक युथ पॅरा गोलबॉल स्पर्धेसाठी भारताच्या संभाव्य आठ खेळाडूंमध्ये निवड झाली आहे.

इंडियन ब्लाइंड स्पोर्ट्स असोसिएशनच्या (आयबीएसए) गोलबॉल उप-समितीने जागतिक युथ पॅरा गोलबॉल स्पर्धेसाठीच्या मुलींच्या संघासाठी अंतिम आठ संभाव्य खेळाडूंची घोषणा केली.

अहिल्यानगरची रहिवासी असलेल्या कल्पना ही सेंटर पोझिशनमध्ये खेळते. नडियाद येथे (गुजरात) दुसऱ्या युथ पॅरा गोलबॉल राष्ट्रीय स्पर्धेत तिने चमकदार खेळ केला. त्या कामगिरीच्या आधारे तिची संभाव्य संघात निवड झाली.

कल्पना हिच्या निवडीबद्दल पॅरा ब्लाइंड स्पोर्ट्स असोसिएशन, महाराष्ट्रतर्फे अभिनंदन करण्यात आले आहे. तिची राष्ट्रीय संघातील निवड प्रत्येक खेळाडूचा आत्मविश्वास उंचावणारी आहे, असे ब्लाइंड स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्रच्या अध्यक्षा नेहा पावसकर यांनी म्हटले.



IBSA

**Indian Blind Sports Association**
(Registered Under the Societies Registration Act, XXI of 1860)
Affiliated with International Blind Sports Federation & Paralympic Committee of India
C/o The Blind Relief Association, Delhi
Lal Bahadur Shastri Marg, Near Hotel Oberoi, New Delhi-110 003 (India)
Tel.: 91-11-24361378, 24360480 & 24364730
E-mail : ndibsa@gmail.com Website : www.blindsportsindia.org

Patrons:
Mrs. Meenakshi Lekhi
Member of Parliament, (L.S.)
Mr. Kartikeya Bharat Ram
Mr. Shiv Kumar Misra

B. GIRLS – PROBABLE FINAL :

| SR. NO. | PLAYER NAME | STATE | POSITION |
|---|---|---|---|
| 1 | AYAR JAYASREE VALA | GUJARAT | LEFT |
| 2 | KALPNA KADAM | MAHARASHTRA | CENTRE |
| 3 | GUDDI KHATUN | HARYANA | CENTRE |
| 4 | LAKKUDORA SHIRISHA | ANDHRA PRADESH | RIGHT |
| 5 | KHUSHI PRAJAPATI | MADHYA PRADESH | CENTRE |
| 6 | KANGALA BHAVNA | ANDHRA PRADESH | LEFT |
| 7 | SALONI PRAJAPATI | MADHYA PRADESH | LEFT |
| 8 | ERRAM HARISHMA | TELANGANA | CENTRE |

The inclusion of a player in the above Probable Final 8 is an indication of the player's present consideration for the Indian team and shall not be construed as confirmation of final selection.

The final selection will be subject to document verification, medical classification, and approval by the Indian Blind Sports Association (IBSA) and the Sports Authority of India (SAI).

All State Affiliates are therefore requested to inform the concerned players and extend their full cooperation in completing the further selection formalities and requirements as and when communicated by IBSA and the Goalball Sub-Committee.

We congratulate all the players included in the Probable Final 8 and appreciate the continued support and cooperation of all State Affiliates in the development of Goalball in India.

Yours faithfully,

RishiKant Sharma
chairperson
IBSA Goalball sub committee

Donations to our Association are exempted under Section 80-G of the Income Tax Act 1961

2





## ORBIS कंपनीच्या सहकार्याने अनामप्रेमच्या कौशल्य विकास केंद्रात नवीन सॅनेटरी पॅड मशीन दाखल..!





# तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणाला नवी दिशा...

**एक कदम और फाउंडेशनच्या वतीने अनामप्रेम संस्थेत राहणाऱ्या व शिक्षण घेत असलेल्या दृष्टीहीन विद्यार्थ्यांना स्मार्टफोनचे वितरण करण्यात आले.**

**आजच्या डिजिटल युगात शिक्षण अधिक सुलभ व्हावे, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी आणि ते तंत्रज्ञानाच्या प्रवाहात कुठेही मागे पडू नयेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.**


समाचार

'अनामप्रेम'मधील अविस्मरणीय स्वातंत्र्य दिन!

## अनामप्रेम मधील अविस्मरणीय स्वातंत्र्य दिन..!

# MS-CIT परीक्षेत विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश.!





**अनामप्रेमच्या सर्व विद्यार्थ्यांनी MS-CIT परीक्षा उत्तम गुणांसह यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.!**
**या यशासाठी  शिक्षक, श्री. रोहिदास बडे, श्री. गणेश आठरे व मा. भाग्यश्री कराळे यांचे मार्गदर्शन लाभले.**








**अनामप्रेम च्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात मासिक आढावा बैठक उत्साहात संपन्न झाली. इंजि. अजित माने, अनिल गावडे, अनिता माने व अभय रायकवाड यांच्या उपस्थितीत विभागप्रमुख व प्रकल्पप्रमुखांनी प्रेझेंटेशनद्वारे कार्याचा आढावा सादर केला. यावेळी आगामी योजना व आवश्यक बदलांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**

# नाशिकच्या उडान प्रदर्शनात अनामप्रेमच्या स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद

नाशिक येथील प्रसाद मंगल कार्यालयात आयोजित उडान प्रदर्शनात अनामप्रेमच्या स्टॉलला नाशिककरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागरिक व विविध मान्यवरांनी संस्थेच्या कार्याची माहिती जाणून घेतली तसेच संस्थेच्या उत्पादनांची खरेदी केली. याप्रसंगी महाराष्ट्र समाज सेवा संघाने दिव्यांगनिर्मित उत्पादने खरेदी करून भविष्यातही मागणी नोंदविण्याचे सांगितले, तर सत्कर्म फाऊंडेशननेही संस्थेला आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.







# गगनीचा अढळ तारा — कलेतून सेवाभावाचा अविस्मरणीय प्रवास





पुणे येथील टिळक स्मारक मंदिर येथे रसिक कलारंजन, पुणे निर्मित व श्री. सुधीर भगत आयोजित ‘गगनीचा अढळ तारा’ या कुसुमाग्रजांच्या साहित्यविश्वावर आधारित कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कविता, गीत, गायन, वादन व नृत्याच्या माध्यमातून साकारलेला हा कलाविष्कार मनाला भावला.

या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे कलेला लाभलेली सेवाभावाची सुंदर किनार. कार्यक्रमातून मिळालेले आर्थिक योगदान अनामप्रेम संस्थेच्या दिव्यांगांसाठीच्या कार्याला अर्पण करण्यात आले. या सामाजिक बांधिलकीतून दिव्यांगांच्या स्वावलंबनाच्या कार्याला मोलाचे बळ मिळाले.

# ORBIS च्या सहकार्याने अनामप्रेम संस्थेत सॅनिटरी पॅड मशीनचे उद्घाटन

ORBIS कंपनीच्या सहकार्याने अनामप्रेम संस्था, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे सॅनिटरी पॅड मशीनचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या मशीनमुळे उत्पादन क्षमता वाढून दिव्यांग व्यक्तींना रोजगार व स्वावलंबनाची संधी मिळणार आहे.

यावेळी ORBISच्या प्रतिनिधींनी संस्थेच्या विविध उपक्रमांची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. पाहुण्यांच्या हस्ते मशीनचे लोकार्पण व पूजन करून उत्पादनास सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी Orbis कंपनीचे पदाधिकारी मा. रुचिका विश्वा मा. अपर्णा मिश्रा मा. आर्यन कुमार यांच्या सह संस्थेचे पदाधिकारी तसेच संस्था कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.












माऊली संकुल येथे लावण्यात आलेल्या स्टॉलला माननीय आमदार श्री. संग्राम भैय्या जगताप तसेच गीतरामायणकार श्री. प्रसादजी शेटे यांनी सदिच्छा भेट देऊन स्टॉलची पाहणी केली व शुभेच्छा दिल्या.

# सेवेच्या प्रवासाला सदिच्छा भेटीतून नवी ऊर्जा













## दिव्यांग बांधवांच्या स्नेहाच्या सहवासात, आनंदाचे क्षण झाले अधिक खास...
## वाढदिवस साजरे झाले माणुसकीच्या नात्याने.!





# अनामप्रेममध्ये ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा..!

**अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळा, रवीनंदा संकुल, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.**

**यावेळी उपस्थित पाहुणे श्री. शिवाजी साळवे श्री. दत्ता पवार श्री. अविनाश कुलकर्णी, श्री. पोपट धामणे, डॉ. चेतना बहुरूपी, सौ. मिलन गंधे सौ. गीता महाजन इंजि. शौनक सावरगावकर श्री. विनायक धूत यांनी अनामप्रेमच्या विविध प्रकल्पांची पाहणी केली. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन आणि रोजगारासाठी सुरू असलेले कार्य पाहून त्यांनी समाधान व कौतुक केले.**
**प्रकाशगाण संगीत टीमने स्वागतगीत व देशभक्तीपर गीतांनी सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात केली. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सुंदर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.**














संस्थेच्या हिम्मतभवन, सत्यमेव जयते ग्राम, मंगलप्रकाश वसतिगृह व मराठवाडा प्रकल्पात रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. दिव्यांग भगिनींनी आपल्या दिव्यांग भावांना प्रेम, आपुलकी आणि विश्वासाची राखी बांधून भाऊ-बहिणीच्या अतूट नात्याचा सुंदर संदेश दिला.












## दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत AESA असोसिएशनने साजरा केला रक्षाबंधन उत्सव.!

अनामप्रेम संचलित सत्यमेव जयते ग्राम, निंबळक येथे AESA, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्षाबंधन सण उत्साहात साजरे करण्यात आला. यावेळी AESA चे अध्यक्ष. इंजि. प्रदीप तांदळे व उपाध्यक्ष इंजि. सुनील औटी यांच्यासह सर्व उपस्थित सदस्यांनी अनामप्रेम संस्थेला संगणक संच व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप केले.



# योगातून निरोगी जीवनाची वाटचाल.!

**भारतीय योग संस्थेच्या माध्यमातून श्री. सुधीर बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनामप्रेम संस्थेच्या मंगलप्रकाश वसतिगृह, पुणे येथे मुलांसाठी दररोज एक तास योगा वर्ग नियमितपणे घेतला जात आहे.**

**योगाच्या माध्यमातून मुलांच्या शारीरिक आरोग्यासोबत मानसिक शांतता, एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढविण्याचा हा सुंदर उपक्रम चालू आहे.**





# ‘श्रम ही श्रीराम’ या संकल्पनेतून श्रमदान!





**अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी श्रमदानातून सामाजिक बांधिलकीचा सुंदर संदेश दिला.**

**यावेळी परिसर स्वच्छता, झाडांना आळे करणे तसेच सुंदर ग्रीटिंग कार्ड तयार करणे अशी विविध कामे उत्साहाने करण्यात आली.**

# अनामप्रेम मराठवाडा वसतीगृहातील अपडेट.

## विक्री व प्रदर्शनी महोत्सवात अनामप्रेमचा स्टॉल




माहेश्वरी बहु मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित प्रदर्शनात अनामप्रेमला दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत स्टॉल उपलब्ध करून देण्यात आला. स्थानिक न्यूज चॅनेलवर संस्थेचा विशेष परिचय व बाइट प्रसिद्ध झाल्याने संस्थेच्या प्रसारासाठी उत्तम व्यासपीठ मिळाले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट, छत्रपती संभाजीनगर डॉ. श्री. सदानंद बिडवे साहेब तसेच उद्योगपती डॉ. सतीश लकडे यांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.










छत्रपती संभाजीनगर जिल्हा माहेश्वरी महिला मंडळाच्या दोन दिवसीय सावन मेळाव्यात अनामप्रेमला मोफत स्टॉल उपलब्ध करून देण्यात आला.
उद्घाटन उद्योगपती व माहेश्वरी ट्रस्टचे अध्यक्ष श्री. किशोरीलालजी धूत यांच्या हस्ते झाले. त्यांनी स्टॉलला भेट देऊन संस्थेच्या कार्याची व उत्पादनांची माहिती घेत कौतुक केले.




एक प्रेरणादायी भेट -

डॉ. अनुपमा रत्नाकर वैद्य (वय ८७) यांच्याशी संस्थेचे विश्वस्त श्री. जे. आर मंत्री यांच्या तासभर मनमोकळ्या गप्पा झाल्या. त्यांनी स्वत: तयार केलेली वस्तू भेट देत, ती दिव्यांग बांधवांच्या घरगुती रोजगारासाठी जोडण्याचा सुंदर विचार मांडला.
छोटे-छोटे व्यवसाय जोडून रोजगाराची साखळी उभी करता येते, हा त्यांचा विचार निश्चितच प्रेरणादायी आहे.



# पराभव मानला नाही... म्हणून पुन्हा उभं राहता आलं.!



**संघर्षातून नवजीवनाकडे वाटचाल करणारा योद्धा – राजेश भीमराव राऊत**

**"आयुष्य हे नदीसारखं असतं, कधी शांत तर कधी वेगवान... पण जो प्रवाह थांबवत नाही, तोच शेवटी सागरापर्यंत पोहोचतो महान...!"**

काही माणसांच्या आयुष्यात संकटं येतात आणि त्यांना खचवून जातात; तर काही जण संकटांच्या छाताडावर पाय ठेवून नव्या आयुष्याची वाट निर्माण करतात. राजेश भीमराव राऊत हे अशाच जिद्दी, धैर्यवान आणि संघर्षातून घडलेल्या व्यक्तिमत्त्वाचं प्रेरणादायी उदाहरण आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा तालुक्यातील दहिद बुद्रुक या छोट्याशा गावच्या मातीत १५ डिसेंबर १९७४ रोजी एका साध्या शेतकरी कुटुंबात राजेश यांचा जन्म झाला. परिस्थिती साधी होती; मात्र संस्कार श्रीमंत होते. वडील श्री. भीमराव राऊत जिल्हा परिषद बांधकाम विभागात कार्यरत होते, तर आई श्रीमती गुंफाबाई राऊत यांनी संसाराचा गाडा समर्थपणे सांभाळत मुलांच्या शिक्षणाची आणि संस्कारांची जबाबदारी पार पाडली.

बालपणापासूनच राजेश यांच्या मनात कष्टाची मशागत झाली होती.

"घामाच्या थेंबांतून उमलतं सोनं, कष्टांच्या मातीतच रुजतं स्वप्न; जिद्दीने चालत राहिलं मन, तर नियतीही बदलते एक दिवस नक्कीच..."

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दहिद बुद्रुक येथून प्राथमिक शिक्षण, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, दापोडी, पुणे येथून माध्यमिक शिक्षण, जिल्हा परिषद ज्युनिअर कॉलेज, बुलढाणा येथून उच्च माध्यमिक शिक्षण आणि पुढे जिजामाता कॉलेज, बुलढाणा येथून त्यांनी बी.ए. पदवी संपादन केली.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या मागे न लागता त्यांनी शेतीला आपला जीवनधर्म मानला. मातीशी नातं जोडलं, निसर्गाशी मैत्री केली आणि कष्टाच्या बळावर संसाराची सुंदर वाटचाल सुरू केली. पुढे कमलाताई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. एक मुलगा, एक मुलगी आणि पत्नी कमलाताई असं त्यांचं छोटंसं, सुखी आणि हसतं-खेळतं कुटुंब होतं.

पण...
आयुष्याची कहाणी नेहमी आपल्या मनासारखी लिहिली जात नाही.

**१७ सप्टेंबर २०२२ — आयुष्य बदलून टाकणारा दिवस**
तो दिवस राजेश यांच्या आयुष्यात काळ्या अक्षरांनी कोरला गेला.
नेहमीप्रमाणे वाहन चालवत असताना झालेल्या भीषण अपघाताने त्यांच्या आयुष्याला अचानक एक वेगळंच वळण मिळालं. गंभीर दुखापतीमुळे त्यांच्या पाठीच्या मणक्याला मोठा मार बसला आणि कंबरेखालील शरीराची हालचाल थांबली.
क्षणभरात सगळं बदललं.

कालपर्यंत स्वतःच्या पायावर उभा असलेला माणूस अचानक व्हीलचेअर आणि पलंगावर अवलंबून झाला. शरीराने साथ सोडली होती; पण मनाने हार मानलेली नव्हती.

“अचानक गडद अंधार पसरला, पण मनातील दिवा विझू दिला नाही; शरीर थकलं, वेदनांनी व्याकुळ झालं, तरी जिद्दीची ज्योत मात्र विझू दिली नाही...”

सुरुवातीला बुलढाणा सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार झाले. त्यानंतर संभाजीनगर येथील डॉ. भवटे यांच्या रुग्णालयात व त्यानंतर सिग्मा हॉस्पीटल येथे शस्त्रक्रिया करण्यात आली. अनेक शस्त्रक्रिया, असह्य वेदना, अश्रू, प्रार्थना आणि अनिश्चिततेचे असंख्य क्षण...

शस्त्रक्रियेनंतर जवळपास दीड वर्ष ते अंथरुणाला खिळून होते.
परंतु शरीर स्थिर असलं तरी त्यांचं मन मात्र थांबलेलं नव्हतं.
त्यांनी आशा सोडली नाही.

पुन्हा उभं राहण्याची इच्छा त्यांच्या मनात जिवंत होती. पुनर्वसनाच्या दिशेने त्यांनी प्रयत्न सुरू ठेवले. पुण्यातील एपीडी सेंटरमध्ये त्यांनी फिजिओथेरपी घेतली. अपेक्षित परिणाम मिळत नसतानाही त्यांनी प्रयत्नांची कास सोडली नाही.
कारण राजेश यांना परिस्थिती बदलायची होती; परिस्थितीसमोर शरण जायचं नव्हतं.

**नव्या आशेचा किरण — अनामप्रेम**
नवीन संधीच्या शोधात त्यांचा प्रवास अहिल्यानगर जिल्ह्यातील अनामप्रेम संस्थेच्या स्पाइनल कॉर्ड इंज्युरी सेंटरपर्यंत येऊन पोहोचला.

१२ मे २०२५ रोजी राजेश अनामप्रेममध्ये दाखल झाले.

त्या वेळी त्यांची शारीरिक अवस्था अत्यंत गंभीर होती. मात्र अनामप्रेमने केवळ उपचार दिले नाहीत; त्यांच्या मनात पुन्हा जगण्याची उमेद जागवली.

नियमित फिजिओथेरपी, तज्ज्ञ व प्रशिक्षित डॉक्टरांचे मार्गदर्शन, पुनर्वसनातील सातत्यपूर्ण प्रयत्न, प्रेमळ वातावरण आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे आत्मविश्वासाचा डोस — या सगळ्यांच्या साथीने राजेश यांच्या आयुष्यात हळूहळू परिवर्तन घडू लागलं.

"जेथे पाऊल थांबले होते, तेथे इच्छाशक्तीने वाट निर्माण केली; जेथे स्वप्नं मोडली होती, तेथे नव्या आशेची पहाट उगवली..."

अनामप्रेमच्या सहकार्याने आणि स्वतःच्या अथक जिद्दीने राजेश यांनी उल्लेखनीय प्रगती साधली.

आज ते स्वतः व्हीलचेअरवर बसून हालचाल करतात, स्वतःची अनेक दैनंदिन कामे स्वतः करतात आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे — ते पुन्हा आयुष्याकडे आशेने पाहतात.

कधीकाळी पलंगावर खिळलेलं शरीर आज स्वतःच्या क्षमतेने पुढे सरकत आहे.

ही केवळ शारीरिक प्रगती नाही...
हा एका माणसाने स्वतःच्या मनावर पुन्हा मिळवलेला विजय आहे!
"शरीर थांबलं, पण मन थांबलं नाही..."

राजेश यांची कहाणी आपल्याला एक अतिशय महत्त्वाचा संदेश देते — दिव्यांगत्व शरीराला मर्यादा घालू शकतं; पण मनाला नाही.


संकटांनी त्यांच्या आयुष्याचा मार्ग बदलला, पण त्यांचं ध्येय नाही.
अपघाताने त्यांच्या पायांची ताकद हिरावून घेतली; पण जगण्याची ताकद हिरावून घेऊ शकला नाही.

"हातात नसेल तलवार तरी, धैर्य असेल हृदयात; मग संकटंही नतमस्तक होतात, त्या जिद्दीच्या प्रयत्नात!"

आज राजेश यांचा प्रत्येक दिवस म्हणजे नव्या ऊर्जेचा किरण आहे. त्यांचा प्रत्येक प्रयत्न म्हणजे संघर्षावर मिळवलेला विजय आहे. आणि त्यांची प्रत्येक प्रगती म्हणजे 'अशक्य' या शब्दाला दिलेलं धाडसी उत्तर आहे.

**राजेश राऊत सांगतात...**

**“अनामप्रेम म्हणजे दिव्यांगांच्या जीवनामध्ये प्रकाश टाकणारा सूर्यकिरण आहे. अनामप्रेममध्ये आल्यानंतर माझ्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. येथे नियमित फिजिओथेरपी, तज्ज्ञ आणि प्रशिक्षित डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळते. त्यासोबतच सर्वांत महत्त्वाचं म्हणजे आत्मविश्वासाचा डोस आणि संस्थेचा प्रेमळ आधार मिळतो.**



**या सगळ्यामुळे मला नवजीवन मिळालं आहे. येथील निसर्गरम्य वातावरण मनाला सकारात्मक ऊर्जा देतं. विशेष म्हणजे येथे मिळणाऱ्या सर्व सोयी-सुविधा मोफत आहेत. माझ्यासारख्या अनेक दिव्यांगांसाठी अनामप्रेम ही केवळ संस्था नाही, तर आशेचा किरण आणि नव्या आयुष्याची सुरुवात आहे.”**

**संघर्षातून उमललेली प्रेरणा**

**राजेश भीमराव राऊत यांची कहाणी म्हणजे एका अपघाताची कहाणी नाही.**

**ती आहे—**
**पडल्यावर पुन्हा उठण्याची,**
**हरवल्यावर पुन्हा शोधण्याची,**
**अंधारातही प्रकाशाची वाट पाहण्याची,**
**आणि शरीराने साथ सोडली तरी मनाने साथ न सोडण्याची!**

**त्यांनी सिद्ध करून दाखवलं आहे की,**

**“अडचणी या आयुष्याचा शेवट नसतात; त्या नव्या सुरुवातीच्या पायऱ्या असतात.”**

**राजेश यांच्या आयुष्यात अपघाताने एक अध्याय संपवला असेल; पण अनामप्रेमच्या आधाराने त्यांनी नव्या अध्यायाची सुरुवात केली आहे.**

**आज त्यांची व्हीलचेअर ही त्यांच्या मर्यादेचं प्रतीक नाही...**
**ती त्यांच्या जिद्दीच्या प्रवासाची चाकं आहेत!**

**आणि म्हणूनच राजेश राऊत यांची कहाणी प्रत्येकाला सांगते—**
**“परिस्थिती कितीही कठीण असो, मनात जिद्द जिवंत असेल, तर आयुष्य पुन्हा नव्याने उभं करता येतं!”**


संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

## अनामप्रेम कौशल्य विकासालय अंतर्गत कौशल्य निर्मिती



हवाई चप्पल, क्रॉक्स

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करून त्यांना रोजगारक्षम बनवा.



नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड



**मुख्य ऑफिस ( गांधी मैदान) : 9011004576, 9422054956**

**सत्यमेव जयते ग्राम ( निंबळक ) : 7350517778, 7350013805**

**यशवंत प्रकल्प ( निंबळक ) : 7350013803, 9422307116**

**कौशल्य विकास केंद्र, निंबळक - 9011918786, 7350013806**

**मंगल प्रकाश वसतिगृह ( पुणे ) : 9011750022, 9372404963**

**मराठवाडा वसतिगृह ( छ. संभाजी नगर ) : 9011750035, 9921509199**

### देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| | |
|---|---|
| Bank Name | State Bank Of India |
| Name Of Account | ANAMPREM |
| Branch | Kalyan road ( SME ), Ahilyanagar (Ahmednagar) |
| Account No | 32144934687 |
| Account Type | Current |
| IFSC Code | SBIN0014794 |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.